# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १६/०१/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. १६/०१/२०१९ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. १०/०१/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | मा. सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ६. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ७. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ८. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| ९. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १०. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ११. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १२. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| २. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ३. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांचे आजच्या सभेसाठी स्वागत. सर्वांना मकर संक्रातीच्या हार्दिक शुभेच्छा. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. १६/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र. १७३, **दि. २७/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

दि. २७/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १७३ :-**

**दि. २७/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. १४७ :-**

दि. २७/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७४, **पुर्नविनीयोजनाबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**धृवकिशोर पाटील :-**

सन २०१८-१९ या वर्षाच्या "क" अर्थसंकल्पात खालील लेखाशिर्षाप्रमाणे तरतूद शिल्लक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष तपशील | मुळ अनुदान | आजपर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १) | **ब) भांडवली खर्च**<br>**अमृत योजना**<br>**क) मनपा हिस्सा** | १०००.०० लक्ष | ०.०० लक्ष | १०००.०० लक्ष |
| २) | **महसुली खर्च**<br>पाणी बील<br>(कोड नं. २२११) | ६५००.०० लक्ष | ३७१९.३२ लक्ष | २२८०.६८ लक्ष |

वरील लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद शिल्लक आहे. पाणी पुरवठा विभागातील काही लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद संपल्याने वा अपुरी असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील काही तातडीने करावयाची कामे प्रलंबित आहेत. वितरण व्यवस्था/किरकोळ खरेदी/दुरुस्ती, पंपिंग व संपगृह विजदेयक, नविन जलवाहिनी टाकणे, मागील पाणी पुरवठा योजना याकरीता पुढीलप्रमाणे पाणी बिल व अमृत योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्षा अंतर्गत शिल्लक राहिलेली तरतूद वर्ग करण्यात यावी.

**अ) महसुली खर्च**

पाणी बिल या लेखाशिर्षातून रु.१७५.०० लक्ष

१) वितरण व्यवस्था व किरकोळ खरेदी / दुरुस्ती - रु.१००.०० लक्ष

२) पपिंग व संपगृह विजदेयक - रु.७५.०० लक्ष

**ब) भांडवली खर्च**

अमृत योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्षातून रु.५००.०० लक्ष

१) नविन जलवाहिनी टाकणे - रु.४००.०० लक्ष

२) मागिल पाणी पुरवठा योजना - रु.१००.०० लक्ष

**एकूण रु.६७५.०० लक्ष**

वरील नमूद केल्याप्रमाणे १) वितरण व्यवस्था/किरकोळ खरेदी/दुरुस्ती २) पंपिंग व संपगृह विजदेयक, ३) नविन जलवाहिनी टाकणे व ४) मागील पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षांकरीता वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय माझा ठरावाला विरोध नाही. माझा एक प्रश्न आहे. अमृत योजना महापालिकेचा हिस्सा आहे. अमृत योजनेअंतर्गत काय काम करायची त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो अमृत योजनेमध्ये जो महापालिकेचा हिस्सा आहे तो आपण ठेवलेला आहे. तो १० कोटी आपल्या निधीतून ठेवलेला आहे. तो लगेच खर्ची पडणार नाही. मूळ आपण ५ कोटी प्रस्तावित केले आहेत. अमृत योजनेमध्ये शासन लेवलला प्रस्ताव सादर केलेला नाही. पुढील वर्षामध्ये जाईल.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १७४ :-**

**पुर्नविनीयोजनाबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. १४८ :-**

सन २०१८-१९ या वर्षाच्या “क” अर्थसंकल्पात खालील लेखाशिर्षाप्रमाणे तरतूद शिल्लक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष तपशील | मुळ अनुदान | आजपर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १) | **ब) भांडवली खर्च**<br>**अमृत योजना**<br>**क) मनपा हिस्सा** | १०००.०० लक्ष | ०.०० लक्ष | १०००.०० लक्ष |
| २) | **महसुली खर्च**<br>पाणी बील<br>(कोड नं. २२११) | ६५००.०० लक्ष | ३७१९.३२ लक्ष | २२८०.६८ लक्ष |

वरील लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद शिल्लक आहे. पाणी पुरवठा विभागातील काही लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद संपल्याने वा अपुरी असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील काही तातडीने करावयाची कामे प्रलंबित आहेत. वितरण व्यवस्था/किरकोळ खरेदी/दुरुस्ती, पंपिंग व संपगृह विजदेयक, नविन जलवाहिनी टाकणे, मागील पाणी पुरवठा योजना याकरीता पुढीलप्रमाणे पाणी बिल व अमृत योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्षा अंतर्गत शिल्लक राहिलेली तरतूद वर्ग करण्यात यावी.

**अ) महसुली खर्च**

पाणी बिल या लेखाशिर्षातून रु.१७५.०० लक्ष

१) वितरण व्यवस्था व किरकोळ खरेदी / दुरुस्ती - रु.१००.०० लक्ष

२) पपिंग व संपगृह विजदेयक - रु.७५.०० लक्ष

**ब) भांडवली खर्च**

अमृत योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्षातून रु.५००.०० लक्ष

१) नविन जलवाहिनी टाकणे - रु.४००.०० लक्ष

२) मागिल पाणी पुरवठा योजना - रु.१००.०० लक्ष

**एकूण रु.६७५.०० लक्ष**

वरील नमूद केल्याप्रमाणे १) वितरण व्यवस्था/किरकोळ खरेदी/दुरुस्ती २) पंपिंग व संपगृह विजदेयक, ३) नविन जलवाहिनी टाकणे व ४) मागील पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षांकरीता वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७५, **पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (उद्यान विभाग)**

**हसमुख गेहलोत :-**

सदरचा विषय पुढील सभेत सादर करण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

पुढच्या मिटींगमध्ये घेऊ..

**प्रकरण क्र. १७५ :-**

**पुर्नविनीयोजन पत्रकास मान्यता देणेबाबत. (उद्यान विभाग)**

**ठराव क्र. १४९ :-**

सदरचा विषय पुढील सभेत सादर करण्यात यावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्री. धृवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७६ प्रशासनाने मागे घेतला आहे. तो महासभेत घेण्यात येईल.

**धृवकिशोर पाटील :-**

विषय मागे का घेतला.

**नगरसचिव :-**

५० लाखाची प्रशासकीय मान्यता आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

पानपट्टे साहेब गेल्या वर्षी पण कांदळवनाकरिता अप्रॉक्सीमेटली १ करोड खर्च केले. त्याच्यातली किती कांदळवन जगली आहेत. त्याचा काही रिपोर्ट वगैरे आहे का? पुन्हा आपण ९९ लाख ७६ हजार खर्च करतो. त्यावर रिपोर्ट द्या ना. कारण कांदळवन असा विषय आहे ती जी झाड असतात मँग्रोज आणि कांदळवनच्या ज्या बिया आहेत. त्या खाली पडतात आणि भरती येते आणि ती झाड उगवतात. राधा स्वामी सत्संगला आम्ही मॉर्निंग वॉकला जातो. तिकडे ती रस्त्याची उजवी बाजू आहे तिकडे समुद्राचे पाणी ते घेतात आणि त्या बिया पडतात ती झाड रुजतात. तिकडे मँग्रोज नव्हती तिकडे सुध्दा मँग्रोज उगवली आहेत. तिकडे खत टाकावे लागत नाही. मागच्या वर्षी १ करोड रुपये खर्च केले होते. त्या १ करोडचे स्टेटस काय? ती झाड कोणत्या एरियात लावली आहेत. आणि तुम्ही संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये लावली आहेत. तर जिकडे ऑलरेडी मँग्रोज आहेत तिथे का लावली कारण भाईंदरच्या चोहो बाजूला मँग्रोज आहेत. भाईंदर वेस्ट जिथे आम्ही रोज जातो जिकडे रेसीडेन्शीयल नाही पण तिथे आपण झाडे लावली नाहीत. बाकी लावली तिकडे कशाला लावली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, मागच्या वर्षी आपल्याला २६ हजाराचे टार्गेट दिले होते. आपल्याकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे राज्य शासनानी मोठा प्रकल्प हाती घेतलेला जवळपास ५० कोटी झाडे लावायचा त्याचे आपल्या महापालिकेला ३०,००० झाडे लावायचे टार्गेट होते. त्याच्यात २६,००० मँग्रोजची झाड लावली होती. खाडी सोडून ज्याठिकाणी खार लॅन्ड आहेत त्या ठिकाणी खार पाणी पोहोचू शकत नाही. अशा जागा आपण आयडेन्टीफाय केली होती. नविन ठिकाणी जी झाड लावणार आहोत राज्य शासनाची कलेक्टर लॅन्ड आहे. त्या कलेक्टर लॅन्डवर सर्व्हे केलेला आहे. त्याची आपण जिल्हाधिका-याकडून परवानगी घेतली आहे. त्याठिकाणी आपण झाड लावणार त्या ठिकाणी रोड टच लावायला लागणार. तिथे पाणी जात नाही. अजून एक नो डेव्हलपमेंट लॅन्ड आहे आणि कलेक्टर लॅन्डला टार्गेट दिले होते. आमच्याकडे जमिन नाही. तर आम्हाला जमिन द्या. त्यांनी जमिन दिलेली आहे. प्रत्येक महापालिकेकडे टार्गेट आहे. ३३००० कोटी झाडे लावायचे टार्गेट आहे. त्या अनुषंगाने महापालिकेकडे ६०,००० झाडे लावायचे टार्गेट आहे. त्याच्यात ५६,००० मँग्रोज लावणार आहोत. त्यासाठी राज्यशासनानी कलेक्टरच्या माध्यमातून जागा दिलेल्या आहेत. मागच्या वर्षी २६००० झाडाचे युटेक केलेले आहे आपल्याकडे बुकलेट आहे. जवळपास ७५ टक्के झाड जिवंत आहेत. त्याचा सर्व रिपोर्ट आहे. कोणते झाड, कुठे लावले. प्रत्येकाचे फोटो काढले आहेत. त्याविषयी सविस्तर प्रेझेन्टेशन देतो.

**धृवकिशोर पाटील :-**

आमचा विषय कांदळवनाचा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२६,००० झाड कांदळवनात लावली आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

कुठल्या एरियामध्ये लावली आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मोर्वा, राईला लावली आहेत. त्याचे प्रेझेन्टेशन दाखवतो.

**धृवकिशोर पाटील :-**

पुढच्या स्टॅन्डिंगला प्रेझेन्टेशन दाखवा. बुकलेट पण सर्व सदस्यांना द्या.

**राजीव मेहरा :-**

एन.एच.ए.आय का जो ब्रिज का काम चल रहा है वहाँ पे काफी मँग्रोज निकाले गए। करीब दीड दो एकर में काम चल रहा है। एन.एच.ए.आय ने वो जमिन ली है। वह मँग्रोज का रिप्लेसमेंट दिया क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कमसे कम ७००-८०० झाड निकाले.........

**राजीव मेहरा :-**

मैं झाड की बात नही कर रहा हूँ। मैं मँग्रोज की बात कर रहा हूँ। कॉर्नर पे जहाँ पिलर लगाने है वहाँ पे उनका काम चल रहा है। उसपर मँग्रोज थे मैंने वृक्ष प्राधिकरण के मिटींग में भी बोला था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हमारे परमिशन की जरुरत नही।

**राजीव मेहरा :-**

लेकिन जो भी मँग्रोज निकाले है उसका रिप्लेसमेंट..............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मँग्रोज निकालने की परवानगी वृक्ष प्राधिकरण दी थी।

**राजीव मेहरा :-**

उन्होंने हायकोर्ट में ॲप्लीकेशन डाला था। उसका अप्रुव्हल आया नही था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

उसकी परवानगी हुई नही।

**राजीव मेहरा :-**

मँग्रोज निकले है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नॅशनल हायवे से पूछता हूँ।

**राजीव मेहरा :-**

उसका मैंने ऑब्जेक्शन लिया था।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मैं जानकारी लेता हूँ।

**तारा घरत :-**

सी.आर.झेड मध्ये भरणी करण्याची परवागनी आहे का? आमची जागा सी.आर.झेड मध्ये आहे आणि तिथे भरणी चालू आहे. तो रवि बिल्डर म्हणून आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कुठे आहे.

**तारा घरत :-**

कनाकियाच्या मागे. आम्ही तिकडे भरणी चालली आहे. २-३ वेळा गाड्या पकडून दिल्या. बोजा तर आमच्यावरच चढवणार. त्याच्यासाठी आम्ही डंम्पर पकडून दिले. मँग्रोज आहे तिकडे भरणी चालू आहे. ते लोक सांगतात रवि डेव्हलपर कोण तरी आहे. त्यांनी करायला घेतले आहे. काल पण भरणी झाली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

संबंधीत वॉर्ड ऑफिसरना विचारतो.

**तारा घरत :-**

महापालिकेचा वॉचमन आहे. त्याला विचारले तर त्याला पण दम देतात.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब तुमच्या आरोग्य विभागाच्या मुकादमाना १०,०००/- रुपये पर मन्थ पेट्रोलसाठी देतो. मग त्यांचे लक्ष देण्याचे काम आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांनी विषय वर्ग केला आहे. आमच्याकडे दुसरी काम होती म्हणून...........

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही आमच्याकडून मंजूरी घेतली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आमचे स्वच्छ सर्वेक्षणचे काम असल्यामुळे आम्ही ते काम थांबवले.

**तारा घरत :-**

भरणी करतात आणि खोटे पेपर बनवतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

खेत्रे त्यांची माहिती घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७७, **मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजना ठाणे महानगरपालिका हद्दीमधील बाळकुम येथील बी .एम.सी. पाईप लाईन छेदून १५०० मी.मी. व्यासाची केसिंग पाईप मॅक्रोटनलिंग किंवा तत्सम ट्रेचलेस पध्दतीने अंथरणे निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत ते पाटलीपाडा दरम्यान १५९० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणेचे काम बाळकुम येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ट्रेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणे व्यतिरिक्त पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६०० मिटर व्यासाची जलवाहिनी रस्त्यालगतच्या पदपथावरुन अंथरुन अंशतः पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक असणारा १२५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणी जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी प्राप्त आहे. सदर परवानगीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अस्तित्वातील १८०० मि.मी. ते २७५० मि.मी. व्यासाच्या ५ जलवाहिन्या सुमारे ८ ते ९ मिटर खोलीवर छेदून मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रस्तावीत जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. तसेच सदर ठिकाणी सुमारे ४.५ मिटर खोलीवर कठीण दगडाचा स्थर लागलेला

आहे. यास्तव ठेकेदाराने सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने अतिरिक्त बाबीची मागणी केलेली होती. याअनुषंगाने याबाबत मे. वाप्कोस लि. तसेच आय.आय.टी. मुंबई यांनी देखील सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असून अदयावत पध्दतीचा वापर करणे आवश्यक असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

१) दि. १९/१०/२०१८ रोजीच्या मा. महासभेने विषयांकीत कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन सदरचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे. असा ठराव मंजूर केलेला आहे.

२) त्यानुसार निविदा सुचना क्र.२५ (२०१८-१९) दि.३०/१०/२०१८ रोजी नुसार विषयांकीत कामाची बी-२ निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | Tender Id No. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | 368002_1 (25/01) | ठाणे महानगरपालिका हद्दीमधील बाळकुम येथील बी.एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० मि.मी. व्यासाची केसिंग पाईप मॅक्रोटनलिंग किंवा तत्सम ट्रेंचलेस पध्दतीने अंथरणे. (निविदा बी-२) | रु.२,२०,६०,२२३/- |

निविदा सादर करण्याच्या मुळ कालावधीत फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याने निविदेस प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. प्रथम मुदतवाढीअंती दि.०५/१२/२०१८ पर्यत तीन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदेतील दोन निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरले आहेत व एक निविदाधारकाने निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरत असल्याने त्यांची निविदा रद्द करुन उर्वरीत दोन निविदांचे आर्थिक देकार उघडणेस मा. निविदा निवड समितीची दि.१४/१२/२०१८ रोजीच्या बैठकीत मंजूरी घेऊन दोन पात्र निविदा धारकांचे आर्थिक देकार उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| NIC Count | | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | पात्र निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|
| Tender Id No. | Bid Count | | | |
| 368002_1 (25/01) | 3 | रु. ३६७६७०.३८/- प्रति मिटर | १) मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. | रु.३,२३,०००/- प्रति मिटर |
| | | | २) मे. वर्धमान इंजिनियरींग वक्स | रु.३,४२,०००/- प्रति मिटर |

वरील तक्त्यानुसार मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. यांचा देकार सर्वात कमी दराचा असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीबाबत दि. १८/१२/२०१८ रोजी मा. निविदा निवड समिती समोर बोलाविण्यात आले होते. वाटाघाटी दरम्यान त्यांनी त्यांचे दर वाजवी असल्याने दर कमी करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. यानी सादर केलेल्या दरानुसार कामाची एकूण किंमत रु. ६० X ३२३००० = १,९३,८०,०००/- इतका येत आहे. व कामाची अंदाजपत्रकीय रु. २,२०,६०,२२३/- इतकी आहे. म्हणजेच ठेकेदाराने सादर केलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु. २६,८०,२२३/- ने कमी आहे. म्हणजेच ठेकेदाराने सादर केलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१५ % कमी आहे.

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. यांच्या रु. ३,२३,०००/- प्रति मिटर या दराच्या निविदेस ही सभा मंजूरी देत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**जुबेर इनामदार :-**

पाणी पुरवठ्याचा विषय आहे. शहरामध्ये पाण्याची परिस्थिती रोज बिकट होत चालली आहे. ७५ एम.एल.डी पाण्याच्या कामाचा टप्पा कुठपर्यंत आलेला आहे.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो ७५ एम.एल.डी. पाण्याचे काम हे साकेत ते मिरा भाईंदरपर्यंत जे काम आहे. ते १ वर्षापूर्वी काम कम्पलीट करुन त्यातून पाणी सुरु केलेले आहे. त्याठिकाणी बी.एम.सी. चा क्रॉस लाईन करायची होती. त्याठिकाणी पाच मोठमोठ्या लाईन आहेत. ते क्रॉसींग करणे शक्य झाले नसते. म्हणून आपण तात्पुरत्या स्वरुपाची ६०० एम.एमची लाईन टाकलेली आणि आपली लाईन कार्यान्वीत केलेली आहे. आता ती ६०० एम.एम.ची लाईन रिप्लेस करायची आहे कारण भविष्यात जास्त पाणी येण्यासाठी आणि सेफ्टी म्हणून हे काम करणे गरजेचे आहे. ७५ एम.एल.डी. पाण्यापैकी १.४० एम.एल.डी. पाणी आपल्याकडे आलेले आहे. आपण पाणी सुरु केलेले आहे. आपले इ.एस.आर कम्पलीट झाले दोन इ.एस.आर. चे काम बाकी आहे. बाकीचे इ.एस.आर चे काम कम्पलीट झालेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

७५ एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना तयार केली. २७५ कोटी रुपये त्याच्यामध्ये ह्या कामाचा समावेश नव्हता का? ही जी काम दिली आहेत ती योजनेमधला भाग नाही का?

**सुरेश वाकोडे :-**

ह्या ठिकाणी आपण सर्वेक्षण केले त्या ठिकाणी डेप्थ जास्ती आहे. पहिले तसे नव्हते ह्या ज्या अडचणी नंतर आल्या त्यामुळे काय केले. बी.एम.सी. ची जी मागणी आहे नंतर परवानगी देताना आलेली आहे. त्यानंतर हे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

७५ एम.एल.डी. योजना करताना डी.पी.आर तयार करण्यात आला. तेव्हा कन्सल्टन्ट होता. त्याला एवढे समजले नाही का की पालिकेचा अधिक ७५ एम.एल.डी. योजना तयार होईल. तेव्हा डी.पी.आर तयार झाला कन्सल्टन्ट नेमला गेला. ७५ एम.एल.डी. च्या नावावर खर्च वाढत चालला आहे.

**सुरेश वाकोडे :-**

त्याच्यामध्ये मायक्रोप्लानिंग केल्याशिवाय काम होत नाही. बी.एम.सी. ची रिक्वायरमेंट काय आहे. आमची लाईन ७ मीटर खाली आहे. ७ मीटरच्या खाली तुम्ही ३ मीटरचा बॉटम सोडून टाका. त्याठिकाणी त्यांनी जे स्पेसिफिकेशन दिले आहेत. तसे आपल्याला मॉडीफिकेशन करायला लागतात.

**जुबेर इनामदार :-**

कन्सल्टंट नेमला गेला. डी.पी.आर तयार डी.पी.आर ला मंजूरी दिली गेली म्हणजे ह्याचा अर्थ तुमचा कन्सल्टंट सक्षम नव्हता का?

**सुरेश वाकोडे :-**

सक्षमचा प्रश्न नाही. ह्याच्यामध्ये आपण सर्व परवानग्या १०० टक्के मिळवून नंतर कामाला सुरुवात करतो. आपण कामाला सुरुवात करतो. काही परवानग्याचा फॉलोअप चालू असतो. बी.एम.सी. ची परवानगी.

**जुबेर इनामदार :-**

परवानगीचा विषय कुठे येतो.

**सुरेश वाकोडे :-**

बी.एम.सी. ची कंडीशन काय आहे की आमच्या पाच लाईन आहेत. २०००, २७००, १६०० अशा मीटरच्या लाईन आहेत. त्या लाईनच्या खाली लाईन टाकायची. त्या लाईनला अटॅच करुन लाईन टाकायची नाही. ३ मीटर बॉटमच्या खाली गॅप सोडून लाईन टाका. आपण ह्याच्यात पाईप लाईन वरुन टाकणार असे प्रस्तावित केले होते. परंतु बी.एम.सी ने तशी परमिशन दिली नाही. बी.एम.सी. ने परमिशन खालून टाका अशी दिली.

**जुबेर इनामदार :-**

कन्सल्टन्टनी सर्व्हे केला असेल त्यांनी आपल्या कार्यालयात बसून.............

**सुरेश वाकोडे :-**

बी.एम.सी. ही वेगळी यंत्रणा आहे. ती परमिशन कशी देते ते आपण कसे समजणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब पाणी येणार होता कुठून?

**सुरेश वाकोडे :-**

आपण अगोदर सांगितले होते ना. आपण त्यांना मागणी केली होती.

**जुबेर इनामदार :-**

१७५ एम.एल.डी. म्हणजे त्यांना टी.एम.टी. लागणार बी.एम.सी. लागणार त्यांच्या आलेल्या अडचणी त्याच्या काय पाण्याच्या लाईन छेदायचे त्याचा समावेश आहे.

**सुरेश वाकोडे :-**

जर त्यांनी परमिशन वरुन दिली असती तर खरोखर छेदले असते पण त्यांनी अवॉईड केली. त्यांनी सांगितले खालून कनेक्शन घ्या. त्यामुळे हा चेंजेस झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

७५ एम.एल.डी. पाण्यावर ७३ कोटीपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. मध्ये मध्ये नेहमी एक विषय असा असतो ७५ एम.एल.डी. चे आमिष दाखवून आमच्याकडून मंजूरी घेतली जाते. पाणी पुरवठ्याला ह्या विषयाला आम्ही विरोध करतच नाही.

**सुरेश वाकोडे :-**

बी.एम.सी ला मागणी केली होती की पाईप लाईनच्या वरुन घ्या. कारण ५ पाईपलाईन आहेत ५ लाईनच्या खालून कसे जाणार वरुन घेण्यासाठी परमिशन टाकली होती. पण बी.एसम.सी. ने फायनल स्टेजला चेंजेस केले आणि त्यांनी सांगितले. ह्या पाईपलाईनच्या खालून जा आणि तिकडे रॉक आहे रॉकच्या खालून तुम्ही आमच्या पाच लाईनच्या खालून ३ मीटर खालून सोडून जा तेव्हा हा चेंजेस झाला.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

एन.ओ.सी. अगोदर दिली नाही का.

**प्रकरण क्र. १७७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजना ठाणे महानगरपालिका हद्दीमधील बाळकुम येथील बी.एम.सी. पाईप लाईन छेदून १५०० मी.मी. व्यासाची केसिंग पाईप मॅक्रोटनलिंग किंवा तत्सम ट्रेंचलेस पध्दतीने अंथरणे निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिरिक्त ७५ द.ल.ली. पाणी पुरवठा योजने अंतर्गत साकेत ते पाटलीपाडा दरम्यान १५९० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणेचे काम बाळकुम येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ट्रेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणे व्यतिरिक्त पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ६०० मिटर व्यासाची जलवाहिनी रस्त्यालगतच्या पदपथावरुन अंथरुन अंशत: पाणी पुरवठा सुरु केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक असणारा १२५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी सदर ठिकाणी जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या टेंचलेस पध्दतीने छेदून अंथरणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगी प्राप्त आहे. सदर परवानगीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अस्तित्वातील १८०० मि.मी. ते २७५० मि.मी. व्यासाच्या ५ जलवाहिन्या सुमारे ८ ते ९ मिटर खोलीवर छेदून मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रस्तावीत जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. तसेच सदर ठिकाणी सुमारे ४.५ मिटर खोलीवर कठीण दगडाचा स्थर लागलेला आहे. यास्तव ठेकेदाराने सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असल्याने अतिरिक्त बाबीची मागणी केलेली होती. याअनुषंगाने याबाबत मे. वाप्कोस लि. तसेच आय.आय.टी. मुंबई यांनी देखील सदरचे काम विशिष्ट प्रकारचे असून अदयावत पध्दतीचा वापर करणे आवश्यक असल्याबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

१) दि. १९/१०/२०१८ रोजीच्या मा. महासभेने विषयांकीत कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन सदरचे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात यावे. असा ठराव मंजूर केलेला आहे.

२) त्यानुसार निविदा सुचना क्र.२५ (२०१८-१९) दि.३०/१०/२०१८ रोजी नुसार विषयांकीत कामाची बी-२ निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | Tender Id No. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | 368002_1 (25/01) | ठाणे महानगरपालिका हद्दीमधील बाळकुम येथील बी.एम.सी. पाईपलाईन छेदून १५०० मि.मी. व्यासाची केसिंग पाईप मॅक्रोटनलिंग किंवा तत्सम ट्रेंचलेस पध्दतीने अंथरणे. (निविदा बी-२) | रु.२,२०,६०,२२३/- |

निविदा सादर करण्याच्या मुळ कालावधीत फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याने निविदेस प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. प्रथम मुदतवाढीअंती दि.०५/१२/२०१८ पर्यत तीन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदेतील दोन निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरले आहेत व एक निविदाधारकाने निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरत असल्याने त्यांची निविदा रद्द करुन उर्वरीत दोन निविदांचे आर्थिक देकार उघडणेस मा. निविदा निवड समितीची दि.१४/१२/२०१८ रोजीच्या बैठकीत मंजूरी घेऊन दोन पात्र निविदा धारकांचे आर्थिक देकार उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| NIC Count | | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | पात्र निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|
| Tender Id No. | Bid Count | | | |
| 368002_1 (25/01) | 3 | रु. ३६७६७०.३८/- प्रति मिटर | १) मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. | रु.३,२३,०००/- प्रति मिटर |
| | | | २) मे. वर्धमान इंजिनियरींग वर्क्स | रु.३,४२,०००/- प्रति मिटर |

वरील तक्त्यानुसार मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. यांचा देकार सर्वात कमी दराचा असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीबाबत दि. १८/१२/२०१८ रोजी मा. निविदा निवड समिती समोर बोलाविण्यात आले होते. वाटाघाटी दरम्यान त्यांनी त्यांचे दर वाजवी असल्याने दर कमी करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. यानी सादर केलेल्या दरानुसार कामाची एकुण किंमत रु. ६० X ३२३००० = १,९३,८०,०००/- इतका येत आहे. व कामाची अंदाजपत्रकीय रु. २,२०,६०,२२३/- इतकी आहे. म्हणजेच ठेकेदाराने सादर केलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु. २६,८०,२२३/- ने कमी आहे. म्हणजेच ठेकेदाराने सादर केलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१५ % कमी आहे.

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता मे. जिप्सम स्ट्रक्चरल इंडीया प्रा.लि. यांच्या रु. ३,२३,०००/- प्रति मिटर या दराच्या निविदेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७८, **भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास निविदा मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

**राकेश शाह :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात निविदा मागविण्यात आलेली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (अंदाजित रक्कम रु. १,७७,९९,८९६/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. एस.एम.डेव्हलपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दर**<br>**वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दर** |
| २) मे. जे.एस.इन्फ्राटेक | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.९९% जास्त दर |

निविदा सुचना क्र.२५/०२ (२०१८-१९) दि.३०/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता प्रथम मुदतवाढ प्रसिध्दीअंती दि.०५/१२/२०१८ पर्यत दोन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदेतील दोन निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरले आहेत. सदर निविदेतील आर्थिक देकाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यास मा. निविदा निवड समितीने दि.१८/१२/२०१८ रोजी शिफारस केलेली आहे.

सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.१,८८,५२,५९३/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ५.९१% जास्त होत आहे. म्हणजेच निविदाधारकाने सदर निविदेतील दर सुधारीत अंदाजपत्रकापेक्षा २.५९% जास्त भरलेले आहेत.

निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क , पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. १,९४,०३,९१७/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०१ % जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.५१% कमी दराचा आहे.

सबब सदर कामासाठी ठेकेदाराचा ८.५०% जास्त दराचा देकार हा चालू दरसुचीशी मुल्यमापन केल्यास २.५९% जास्त दराचा व चालू दरसुची तसेच निविदेतील अटी व शर्तीशी मुल्यांकीत केल्यास ०.५१% कमी दराचा आहे. सदरचे काम त्या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक आहे.

वरील तुलनात्मक तक्ता पाहता नमुद कामाकरीता **मे. एस.एम.डेव्हलपर्स** यांचे वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त या प्राप्त दरास मा. निविदा निवड समितीने शिफारस केलेली आहे. तसेच मा.आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त झाली आहे.

**उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. एस.एम.डेव्हलपर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने या दराच्या निविदेस ही सभा मंजूरी देत आहे.**

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १७८ :-**

**भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदि र ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे कामास निविदा मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. १५१ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात निविदा मागविण्यात आलेली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **भाईंदर (प.) शिवसेना गल्ली येथील स्वामी नारायण मंदिर ते कमला पार्क टाकीपर्यंत वितरण जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.** (अंदाजित रक्कम रु. १,७७,९९,८९६/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. एस.एम.डेव्हलपर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दर**<br>**वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दर** |

| | |
|---|---|
| २) मे. जे.एस.इन्फ्राटेक | अंदाजपत्रक दरापेक्षा ८.९९% जास्त दर |

निविदा सुचना क्र.२५/०२ (२०१८-१९) दि.३०/१०/२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता प्रथम मुदतवाढ प्रसिद्धीअंती दि.०५/१२/२०१८ पर्यत दोन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदेतील दोन निविदाधारकांनी निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरले आहेत. सदर निविदेतील आर्थिक देकाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यास मा. निविदा निवड समितीने दि.१८/१२/२०१८ रोजी शिफारस केलेली आहे.

सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.१,८८,५२,५९३/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ५.९१% जास्त होत आहे. म्हणजेच निविदाधारकाने सदर निविदेतील दर सुधारीत अंदाजपत्रकापेक्षा २.५९% जास्त भरलेले आहेत.

निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क , पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. १,९४,०३,९१७/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०१ % जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.५१% कमी दराचा आहे.

सबब सदर कामासाठी ठेकेदाराचा ८.५०% जास्त दराचा देकार हा चालू दरसुचीशी मुल्यमापन केल्यास २.५९% जास्त दराचा व चालू दरसुची तसेच निविदेतील अटी व शर्तीशी मुल्यांकीत केल्यास ०.५१% कमी दराचा आहे. सदरचे काम त्या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक आहे.

वरील तुलनात्मक तक्ता पाहता नमुद कामाकरीता **मे. एस.एम.डेव्हलपर्स** यांचे वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त या प्राप्त दरास मा. निविदा निवड समितीने शिफारस केलेली आहे. तसेच मा.आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त झाली आहे.

**उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. एस.एम.डेव्हलपर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ८.५०% जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने या दराच्या निविदेस ही सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक :- श्री. राकेश शाह                    अनुमोदन :- श्री. धृवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७९, **मनपा क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या स्म शानभुमीमध्ये जळावू लाकडांचा पुरवठा कामाच्या निविदा मंजूरी बाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या स्मशानभुमी मध्ये जळावू लाकडांचा पुरवठा करणेकामी दि.**18/09/2018** रोजीच्या दै. नवाकाळ, दै. मुंबई लक्षद्वीप दै. ठाणे वैभव या वृत्तपत्रात व **Tender Id No. 2018_MBMC_353485_1** नुसार जाहिर फेर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेस प्रतिसाद मिळून मुदतीत **03** निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त **03** निविदांचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले असता, तांत्रिक लिफाफामध्ये महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तांत्रिक लिफाफामध्ये मे. न्यु ठाणे  न्डकंपनी व मे. अंबालाल खिकाभाई  न्डकंपनी यांनी कागदपत्रे जोडली नसल्याने ते अपात्र ठरले असून मे. एम.डी. दावडा यांनी कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने पात्र ठरले होते.

सदर कामी निविदा व फेर निविदा मागविली असल्याने व पुर्वीच्या निविदेची मुदत संपुष्टात आली असल्याने पात्र निविदाधारक मे. एम. डी. दावडा यांचे दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस मा. निविदा समितीने दि.15/12/2018 रोजी मंजुरी दिली होती. त्यानुसार दि. 18/12/2018 रोजी मे.एम.डी. दावडा यांचा दराचा लिफाफा उघडून दर सादर केले आहेत. सदरचे दर वाटाघाटीसाठी दि. /01/2019 रोजी निविदाधारक यांना निविदा समिती समोर समक्ष बोलविले असता, निविदेत सादर केलेले दर कमी करण्यास नकार दिला आहे. सदरचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | निविदाकाराचे नाव | दर |
|---|---|---|---|
| 1 | स्मशानभुमी करीता जळाऊ लाकडे पुरवठा करणे | मे. एम.डी.दावडा | रु. 4.59 प्रती किलो |

वरीलप्रमाणे मे. एम.डी.दावडा या निविदाकाराने सादर केलेल्या दरानुसार निविदा स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

